31/2018

Sm 2017-18

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता ®

रविवार, दि.२५ फेब्रुवारी २०१८

भारतीय विद्यामंदिर, अमरावतीद्वारा संचलित

**भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती**

(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्न)

**व**

**आधार सोशल रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती**

यांच्या संयुकत विद्यमाने आयोजित

## राष्ट्रीय चर्चासत्र

## ''मराठी साहित्य : चर्चा आणि चिंतन''

**प्राचार्य**
जी.एस.मेश्राम
भारतीय महाविद्यालय,मोर्शी
ता.मोर्शी,जि.अमरावती

**मुख्य संपादक**
प्रा.विराग गावंडे
संचालक
आधार सोशल रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट
ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती

**संपादक**
प्रा.डॉ.भगवान जे.साबळे
मराठी विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय,
मार्शी, जि.अमरावती

आयोजक

**मराठी विभाग**

**भारतीय महाविद्यालय, मोर्शी,जि.अमरावती**

**आणि**

**आधार सोशल रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इनिस्टट्यूट, अमरावती**

Smt. Sindhutai Jadhav Maha Menkar 330

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

विद्यावार्ता

भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित

भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती

(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्न)

व आधार सोशल रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

राष्ट्रीय चर्चासत्र

# "मराठी साहित्य : चर्चा आणि चिंतन"

**रविवार, दि. २५ फेब्रुवारी २०१८**

श्री. जी. एस. मेश्राम

प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, मोर्शी ता. मोर्शी, जि.अमरावती

**मुख्य संपादक**

प्रा. विराग गावंडे

संचालक, आधार सोशल रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती

**संपादक**

प्रा. डॉ. भगवान जे. साबळे

मराठी विभाग प्रमुख, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती

**आयोजक**

**मराठी विभाग**

**भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती**

**व**

**आधार सोशल रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

330

Scanned by TapScanner

26) विविधांगी लावणी
प्रा. डॉ. सुलभा खर्चे, अकोला. || 92

27) झाडे झाली हिरविशी : कवी ना. धों. महानोर
प्रा. डॉ. प्रियदर्शनी देशमुख, चांदूरबाजार || 94

28) दलित आत्मकथनातील सामाजिकता
डॉ. दीपाली प्र. गावंडे, अकोला || 97

29) ढसाळांच्या कवितेतील विद्रोह, नकार आणि प्रतिमा
प्रा. हेमंतकुमार विठ्ठलराव बागडे, जि. नागपूर || 101

30) आदिवासी साहित्य आणि जागतिकीकरण
प्रा. डॉ. राजेश चवरे, जि. यवतमाळ || 105

31) उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखवणारा लेखक—रामनाथ चव्हाण
प्रा. गौतम बनसोडे, पुणे || 108

32) आंबेडकरवादी गझलेचा सूर्योदय-वामनदादा कर्डक
प्रा. डॉ. प्रशांत धनवीज, जि.वर्धा || 111

33) ग्रामीण साहित्य ग्रामीण साहित्यातील कथा विश्व
श्री. प्रवीण मारोतराव देवघरे || 113

34) यादवकालीन समाजजीवनदर्शन (लीळाचरित्र एकाकच्या आधारे)
प्रा. डॉ. सविता माधवराव पवार, जि. बुलडाणा || 115

35) नामदेव कांबळेच्या 'उनसावली' तील झळा
प्रा. डॉ. विजय एम. जाधव, वाशीम || 118

36) मथुरा लभाण बोलीतील होळीगीते : एक आकलन
प्रा. डॉ. भगवान जे. साबळे, मोर्शी || 121

37) वैदर्भीय बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास : भाषा ओळख आणि संवर्धन
डॉ. प्रदीप औजेकर, जि. जळगाव || 125

38) संत साहित्यामध्ये संत कवयित्रींची अभंरचना
प्रा.संभाजी बाबाराव सावंत, जि.जळगांव || 127

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by TapScanner

म्हंजी नरेंद्रराव तेजराव देशमुख. बाळासाहेब बी म्हणतात त्याहीले. हे अन मी शाळेत बरोबरच होतो. पण ते किती पूढी गेले. सायेब झाले. अन मी बसलो. गायी गवारं वळत कडकी पृष्ट क. ३२/३८

४. कमाई : या कथा संग्रहात एखादा शिकलेला मुलगा नोकरी मिळत नाही म्हणून घरची शेती करायला तयार होतो पण घरच्यांच्या आशा पल्लवीत झालेल्या असतात. त्याने नोकरी मिळवून घराकडे पैसा पाठविला पाहीजे असे त्यांना वाटले.

इश्वर्व गुरूजी बेकार असतांना त्यांचा भाउ म्हणतो त्यातील एक प्रसंग व उदा. अहं तंबी आता अजिबात जमायचं नाही. हायेक किती वावर असं बापाच्या हातचं पंधरा एकर त्याच्यावर काय डांबलाचं कमावणार हाये तू ? म्हणते वावरात राबीन आपून जसे काही जमीनदार हाये अन तूले इतकं बी. एससी. बी. एड. शिकोलं ते का वावरात राबण्यासाठी ? सांगून ठेवतो वावरातला तुले आता दानाबी मिळणार नाही. बटाईनं चटाईनं वावर देउन उत्पन्न काढत राहील. आरे तीन पोरी उजवायच्या बावाच्या नाना मधल्या त्याहिच्या लग्नास आता पैसा साठवू दे असे कमाई या कथा संग्रहात प्रसंग रेखाटलेले आहेत कमाई पृष्ट क. १२३/१२

**परिशिष्ट**

| | | |
|---|---|---|
| लचांड | — | मेहता पब्लिशिंग हाउस ; पूणे प्रथमावृत्ती १९९३ |
| उठावन | — | मेहता पब्लिशिंग हाउस ; पूणे प्रथमावृत्ती १९९४ |
| महालूट | — | शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर जि. अहमदनगर १९९५ |
| रगडा | — | शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर जि. अहमदनगर २००६ |
| खुदळघास | — | शब्दालय प्रकाशन' श्रीरामपूर जि. अहमदनगर २००८ |

**परिशिष्ट २**

अत्रे त्रि. ना. गावगाडा; तू. आ. मोटे मुबई
कुळकर्णी दा. वि. मराठी कथा; स्वरूप आणि आस्वाद ; १९७६
कुळकर्णी वा. ल.साहित्य ; शोध आणि बोध; १९६७ स्वाध्याय पूणे

34

# यादवकालीन समाजजीवनदर्शन

## (लीळाचरित्र एकाकच्या आधारे)

**प्रा. डॉ. सविता माधवराव पवार**
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर जि. बुलडाणा.

***********

लीळाचरित्र हा मराठी भाषेतील आदयचरित्रग्रंथ आहे. तत्कालीन मराठी गद्यात लिहिलेल्या चरित्रग्रंथाची लीळाचरित्रकार म्हाइंभटांनी शके १२०० च्या सुमारस रचना केली. या ग्रंथामध्ये श्रीचक्रधरस्वामीचे चरित्र 'स्मृती' च्या रूपाने आलेले आहे. त्यांच्याविषयीच्या आठवणी सामान्य बोलीभाषेत तत्कालीन व्यावहारिक गद्यामध्ये आलेल्या आहेत. श्रीचक्रधरस्वामींच्या उत्तरापंथेगमनानंतर लगोलग त्या लिहिलेल्या असल्यामुळे तत्कालीन भाषा जशीच्या तशी ग्रंथांतर्गत आलेली आहे.

लीळाचरित्र ग्रंथाचे एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्ध असे भाग असून एकाकात ७४, पूर्वार्धात ३५८, उत्तरार्धात ४८८ लीळा आहेत. भडोच किंवा भरवसला अवतारधारण केल्यानंतरचा एकाकी अवस्थेतील भ्रमणकाळ ते पैठणला आगमन होईपर्यंतचा भाग 'लीळाचरित्र एकाक' मध्ये आलेला आहे. श्रीचक्रधर स्वामींनी नाथपंथ, जैनपंथातल्या चांगल्या गोष्टींचा स्वीकार केला आणि अनिष्ठ प्रथांचा त्याग करून सर्वसमावेशक असे तत्वज्ञान स्वीकारून महानुभाव पंथाची स्थापना केली. महानुभाव पंथाने संन्यासमार्ग स्वीकारला पण नाथपंथातील हदयोगाला दूर सारले. स्वतंत्र पंचकृष्णावताराची योजना केली. जातीभेद अमान्य केला. मूर्तिपूजा स्वीकारली नाही. सर्व जातीच्या लोकांना पंथात सामावून घेतले.

श्रीचक्रधरस्वामींचे भ्रमण महाराष्ट्रभर समाजातील सर्व स्तरामध्ये सर्व जातीमध्ये, गोरगरीब, दीनदुबळे यांच्यामध्ये होते. त्यामुळे तत्कालीन महाराष्ट्र संस्कृतीची ओळख लीळाचरित्र ग्रंथामुळे घडते. यादवकालीन समाज जीवनाचे दर्शन घडविणारा हा एक मौलिक ग्रंथ आहे.

330 Smt. Sindhutai Jadhav Mehkar



Scanned by TapScanner

डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या मते ''ग्रंथात केवळ चक्रधरस्वामीचेच नव्हे, तर तत्कालीन महाराष्ट्राचेही चरित्र चित्र उमटले आहे. त्यावेळचा समाज, त्याच्या चालीरिती, व्रतवैकल्ये, सणवार, खाणीपिणी, वस्त्रे प्रावरणे, नाणी–गाणी व्यापार टापार अशा अनेक अंगांचे दर्शन घडवून त्या समाजाच्या स्थितीगतीची चांगलीच कल्पना येऊ शकते.''[१]

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात यादवकाळाला अनन्यसाधारण महत्व आहे. लीळाचरित्र एकाकमधील लीळा ह्या श्रीमुखीचे बोल आहेत. त्याचबरोबर चरित्रकार म्हाइंभटांनी सामान्यजनाकडून त्या संकलित केल्या आहेत. त्यामुळे तत्कालीन महाराष्ट्राचे वास्तव दर्शन लीळाचरित्र एकाकच्या आधारे घडते.

यादवकाळात खानावळी होत्या. रांधवणहाटात म्हणजे खानावळीत खाद्यपदार्थ तयार करून विकले जात असत. श्रीचक्रधरस्वामी जुगारामध्ये 'कवडे' जिंकतात आणि त्या कवड्यच्या मोबदल्यात रांधवणहाटात भोजन घेताना दिसतात. रामटेकच्या यात्रेला जाताना श्रीगोविंदप्रभूंची भेट होते. त्यावेळी श्रीप्रभू रांधवणहाटात सेंगुळे बुड्डुयांशी खेळताना दिसतात. काही सेंगुळे बुड्डे ते श्रीचक्रधरस्वामीकडे भिरकावतात आणि ते ग्रहण करून स्वामींना शक्तीस्वीकार झालेला दिसतो. रामटेकच्या यात्रेला जाऊन रामाचे दर्शन घेण्याचा हट्ट धरणारे सर्वज्ञ केवळ ताकभाताचे आरोगण करताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या मातेला काळजी वाटायला लागते. याशिवाय खीरपुरी, लाडवाचाही उल्लेख लीळाचरित्र एकाकात आलेला आहे. मेहकरची बोणेबाई एक लाडू आणि पाणी स्वामींना देते. स्वामी त्या लाडूचा चुरा करून भोजन करतात. बोणेबाई आणि स्वामी रावसगावला मुक्कामाला असताना, त्या ठिकाणी त्यांनी पाणी घालून तयार केलेला भात आणि 'बाबुळशेंगा' भोजनासाठी दिल्या जातात. आणि त्यांचा आनंदाने स्वीकार केला जातो. पैठणला स्वामी बाईसा उर्फ नागोबाईच्या आग्रहावरून तिच्या वसतीच्या ठिकाणी जातात आणि तिच्या सांगण्यावरून हांसूबाईने दिलेला पाणीभात आणि वाळलेला दुधी भोपळा भोजन म्हणून घेतात. मांतगाच्या हातचा हुरडा आणि सोले श्रीगोविंदप्रभू आनंदाने खातात. आंबिलीचा उल्लेखही प्रस्तुत ग्रंथामध्ये येतो. बांबूमध्ये भात शिजविण्याची अनोखी पद्धत गोंड लोकांच्या मध्ये पहायला मिळते. शिवाय भांड्याला चिंचेच्या कुटाचा लेप लावूनही ते भात शिजतात. 'द्विजगोरक्षण' या लिळेमध्ये स्वामी गाई राखण्याचे काम करतात, त्यामुळे त्या गाई भरपूर दूध देतात. खुषझालेला ब्राम्हण आपल्या पत्नीला, स्वामीच्या शिदोरीवर लोणी, दही देण्यास सांगतो.

यादवकाळात विविध देवदेवतांची मंदिरे होती. त्यांची पूजा होत असे. एलिजपुरचे भैरवनाथाचे मंदिर, नांदेडचे नरसिंहाचे तसेच नंदेश्वराचे मंदिर, वडनेरचे वटेश्वराचे मंदिर, लोणारचे कुमारेश्वराचे व भैरवाचे मंदिर, मेहकरचे बाणेश्वराचे व भैरवनाथाचे मंदिर तसेच दर्भेश्वराचे मंदिर, नारायणाचे मंदिर, भिवरेश्वराचे मंदिर अशा अनेक मंदिरांचा उल्लेख लीळाचरित्र एकाकात येतो. अळजपूरच्या अंबीनाथाच्या मंदिरात पुराण सांगितले जाई, नृत्य व गाण्याचा कार्यक्रम होत असे. लोकांची देवदेवतांवर नितांता श्रद्धा दिसते. वाटसरू, यात्रेकरू मंदिराचा आश्रय घेताना दिसतात. शिवाय झाडांचा, पडवीचा, ओट्याचाही आश्रय घेतला जात असे. यात्रेच्या निमित्ताने लोक तीर्थयात्रेला जात असत. लोणारला गेलेली बोणेबाई अष्टतीर्थ करून येते. सिंहस्थ पर्वानिमित्त त्र्यंबकेश्वरला जाते. दरकोस, दरमुक्काम पायी प्रवास करणाऱ्या स्त्रियाही येथे दिसतात. अतिशय उत्साहाने आणि श्रद्धेने त्या यात्रेला निघतात. मुक्कामाच्या गावी लोक त्यांना कणिक, तांदुळ, तूप देऊन मदत करतात. श्रीचक्रधरस्वामी मेहकरात गोकुळाष्टमी उत्साहाने साजरी करतात. बोणेबाई मातीचे गोकुळ करताना स्वामी पाहतात आणि बाईला म्हणतात, ''बाई श्रीकृष्ण काही मातीएचा?: देवकी देवी काइ मातीएची? हें असो देया:?''[२] आणि स्वत: श्रीकृष्ण होतात, बोणेबाई देवकी माता होते. मांडव घातला जातो. खाद्यपदार्थ तळून फुलोरा बांधला जातो. व्रताचरण करणाऱ्यास्त्रियाश्रीकृष्ण म्हणून स्वामींची पूजा करतात. अशाप्रकारे गोकुळाष्टमी उत्सव यथासांग साजरा केलेला दिसतो.

स्पृश्यास्पृश्य भेदाभेद त्याकाळी प्रकर्षाने जाणवतो. विटाळाची कल्पना अस्तित्वात होती. 'चर्मकारा भेटि' या लीळेमध्ये स्वामीनी दिलेला तांबूल एक चांभार भक्षण करतो आणि त्याला स्थिती प्राप्त होते. लोक त्याला देव मानायला लागतात. परंतु तो जातीने

चांभार असल्याने लक्षात आल्यानंतर, त्याने 'गांव बाटविला' म्हणून शिक्षा केली जाते. चुनखडीत पाणी टाकून त्या जागी बसण्याची भयंकर शिक्षा दिली जात असे, याचा प्रत्यय प्रस्तुत लिळेवरून येतो. या लिळेमध्ये सिंघणाच्या राजवटीचा उल्लेख आला आहे. यादवनृप कान्हरदेवाचा उल्लेख 'कुंडी राजेया दरिसन' या लिळेमध्ये येतो. कान्हरदेव स्वामींना 'आसू' ही तत्कालीन सुवर्ण नाणी देतो परंतु स्वामी ती स्वीकारत नाहीत आणि त्या द्रव्यातून मग लोणारच्या कुमारेश्वराच्या मंदिराला पाळी म्हणजे भिंत बांधून दिली जाते.

पुत्रप्राप्तीची अभिलाषा काही लीळांतून दिसते. श्रीमंत मल्लदेवाची स्वामींवर श्रद्धा आहे. त्यांच्या कृपेने आपल्याला पुत्र झाला म्हणून तो पाच सहस्त्र रत्नांचा कमरपट्टा स्वामींना भेट देतो. बारसे, उष्टवन आदी संस्काराचे वर्णनही येते. अशाप्रसंगी अन्नदान केले जात असे. 'ठाकुरभार्या पुत्रदान' ही एक वेगळ्य स्वरूपाची लीळा आहे. आपल्याला पुत्र व्हावा यासाठी ठाकूर आपल्या पत्नीला स्वामीकडे पाठवितो. स्वामींकरवी पुत्रप्राप्तीची अपेक्षा त्याला असते. स्वामींच्या विरक्त वृत्तीची तसेच नियोगाच्या प्रथेची कल्पना या लीळेतून येते.

यादवकाळात अनेक धंदे, व्यवसाय समाजात प्रचलित होते. शेतीचा मुख्य व्यवसाय होता. घोड्यांचा व्यापार करणारे 'हेडाऊ' दिसतात. खानावळी, हलवायांची दुकाने होती. बांधकाम करणारे गवंडी होते. दुधदुभत्यांचा व्यवसाय होता. गुरे राखण्याचे काम केले जायचे. एका लीळेमध्ये स्वामी स्वतः गुरे राखताना दितात. चांभारकाम करणारे चांभार, घाण्यावर तेल काढणारे तेली, गावोगावी मंदिराची देखभाल करणारे गुरव भेटतात. वेठबिगारी पद्धती त्या काळी होती. सावकार होते. समाजात श्रीमंत वर्ग दिसतो तसेच गरीब वर्गाचेही दर्शन घडते. सशाची शिकार करणारे पारधी आहेत. सशासाठी त्यांच्यामध्ये 'होड' लागत असे. बाजारहाटाचे दर्शन काही लिळामधून घडते. काही लोक चोरी करून आपला निर्वाह करताना दिसतात. दादोस उर्फ रामदेव याच्या वडिलांना चोरांनी ठार मारले होते. बोणेबाईच्या घरातील चीजवस्तू चोर चोरतात पण त्यांचा प्रयत्न फसतो आणि खुदद चोरालाच नागविल्या जाण्याचा प्रकार घडतो. लोणारवरून परतताना उपरती झालेले चोर स्वामींना सोंदरानदीपर्यंत आणून सोडतात. दुसऱ्याच्या शेतामध्ये चोरून गुरे राखण्याचा प्रकारही दिसतो. अशा कामासाठी लाच दिली जात असे.

समाजामध्ये अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा प्रचलित होत्या. व्रतवैकल्ये, नवससायास, भूतपिशाच्च, मांत्रिकतांत्रिक यामध्ये समाज गुरफटलेला होता. सावकार पुत्राला ग्रह लागला म्हणजे पिशाच्चबाधा झाल्याने त्याच्यावर मांत्रिक मंत्रोच्चार करतो. उकिरडा व्याला आणि माणूस जन्माला आला म्हणून भयभीत झालेले लोक उकिरड्याची शांती करतात. मांडव घालून गावकरी खीरपुरीचे भोजन देतात. उकीरड्यावर पहुडलेले स्वामीही तेथे जाऊन भोजन करतात.

पुरुषांच्या आज्ञेमध्ये असणाऱ्या स्त्रियांचे लीळाचरित्र एकाकातून दर्शन घडते. घागरीने विहिरीवरून पाणी भरणे, घरकाम, आदरातिथ्य करणाऱ्या स्त्रिया जशा आहेत, तशाच विरक्तवृत्तीने राहणाऱ्या स्त्रियाही आहेत. नागूबाई पैठणला विरक्तवृत्तीने राहते. भिक्षा मागून जगणारी बोणेबाई जोगीण आपल्या प्रेमळ आणि सश्रद्ध अंतः करणाने लक्ष वेधून घेते. महिनाभर उपवास करणाऱ्या तपस्विनी स्त्रिया नारायणाच्या मंदिरात भेटतात. गुरे राखणारा आपला मुलगा ज्वराने आजारी पडला आता आपली गुजराण कशी होईल? म्हणून चिंता करणारी म्हातारी आई दिसते. त्याचबरोबर आपल्या पत्नीचे निधन झाल्याने शोक करणार वामनपेंद्या ब्राम्हण, स्वामीच्या कृपेने आपल्या पत्नीला जीवदान मिळवून देतो. एका ब्राम्हणाची बहीण स्वामीचे सेवादास्य करताना विषयचाळा करते. कामुक हावभाव करणाऱ्या काही स्त्रियांचे वर्णन प्रस्तुत ग्रंथामध्ये येते. एक तपस्विनी स्वामी नको म्हणत असताना त्यांच्या तोंडातील तांबूल खायला मागते. 'द्यावे जी लोकांचे काई' असे म्हणणारी ही स्त्री लोकांची पर्वा करीत नाही. स्वामींच्या हातावर कढत कढत आंबील टाकणारी निष्ठूर स्त्री सुद्धा येथे भेटते. चर्चा करणारी प्रश्न विचारणारी महदाइसा,नटण्या मुरडण्याची हौस असणारी आऊसा असे विविधांगी वास्तवदर्शी स्त्रीजीवनाचे दर्शन प्रस्तुत ग्रंथातून घडते. यादवकाळात वेश्यांची वेगळी वस्ती दिसते.

लीळाचरित्र एकाकातून अधिकारी वर्ग हा अदवीने वागताना दिसतो. तर पाईक हे निष्ठूर वाटतात. स्वामींना चोर समजून तराळ पकडून नेतात. पण



Scanned by TapScanner

अधिकारी मात्र त्यांची सुटका करतात. एका लिळेमध्ये स्वामीला वेठीला धरून कामाला लावले जाते. पण शेतीचा अधिष्ठाता मात्र त्यांच्याशी सन्मानाने वागतो, आदरसत्कार करतो. रामदरणाही स्वामींचा यथोचित आदरसत्कार करतो. रस्त्याने चालणाऱ्यास्वामींना पाईक भाले टोचतात. परंतु अधिकारी मात्र पालखीतून खाली उतरून स्वामींचे सांडलेले अन्न वेचताना दिसतो.

यादवकाळात रिक्त हाताने दर्शनाला न जाता 'दरिसन' म्हणजे भेटवस्तू देण्याची प्रथा होती. लोक द्रव्य लावून जुगार खेळायचे. स्वामी स्वत: जुगार हरल्या जिंकल्याचे उल्लेख येतात. आपलो हा महदाईसेचा भक्त जुगार हरतो. स्वामींना भैरवनाथाच्या मंदिरात जुगाऱ्यांनी त्रास दिल्याचा उल्लेख आलेला आहे. बांधकामासाठी चुना तयार केला जायचा. चुना कसा बनवायचा याविषयी स्वामी सांगतात, 'चुना तो ऐसा : खडे ऐसे भाजावे : ऐसी द्रव्ये होआवी: ऐसी मर्दनी होआवी : इतुके दींस कुहीजो दीयावा: मग ऐसा वाटावा: मग तो चुना सुनेयां पुढां घालिजे: दहींभाताचा उंडा म्हणौनि घे: आणिकाची वास पाहे : तो चुना जाला ऐसें जाणिजे: ऐसा होय तरी करावा: ना तरी फेडावा ना''[३] घरे माळवदाची हातीं. उंची रेशमी वस्त्रे, पासोडी म्हणजे जाडीभरडी वस्त्रे यांचा उल्लेख येतो. रानभेरीचा म्हणजे घोडा–घोडा होण्याचा खेळ मुले खेळत. विवाहामध्ये वऱ्हाडी मंडळी जमत. वाजतगाजत विवाह होत असे. मानसन्मान, आदरातिथ्य केले जाई, सीमांतपूजनाचा एकेठिकाणी उल्लेख येतो. गुरुशिष्यपरंपरा दिसते. गुरुने शिष्याला मत्सरीभावाने विषप्रयोग केल्याचे दिसते. संन्याशांमध्ये वादविवाद होत असत. एका स्पर्धेमध्ये दिग्विजयाला निघालेला संन्याशी जिंकतो आणि त्या गावचा मठ आणि पुस्तक भांडार ताब्यात घेतो असे प्रस्तुत ग्रंथाद्वारे स्पष्ट होते. अशा प्रकारे लिळाचरित्र एकाकद्वारे यादवकालीन समाजजीवनाने वास्तव आणि समग्र दर्शन घडते.

**संदर्भ – टिपा :**

१) श्री. चक्रधरस्वामी लीळाचरित्र 'एकाक', संपादक– डॉ बी. एन. पाटील, डॉ. शिरीष पाटील, जळगाव, आ. दु. २०१०, पृ. क्र. ९

२) तत्रैव, पृ. क्र. ८४

३) तत्रैव, पृ. क्र. ७६

Smt. Sindhutai Jadhav Maha. Mehkar 330

**35**

# नामदेव कांबळेच्या 'उनसावली' तील झळा

**प्रा. डॉ. विजय एम. जाधव**
रा. आ. महाविद्यालय, वाशीम

**प्रस्तावना :-**

नामदेव कांबळेचा 'राघववेळ' कादंबरीने मराठी साहित्याला भूरळ घातली. साहित्य अकादमीने तर 'राघववेळ' च्या यशाला कळस प्राप्त झाले. वाशिम येथिल राणी लक्ष्मीबाई कन्याशाळेत सेवक पदापासून कार्याला सुरुवात करुन शिक्षक या पदावर नामदेव कांबळे सेवानिवृत्त झाले. शिक्षक म्हणून कार्यरत असतांना 'राघववेळ' या कादंबरीला साहित्य अकादमीचे पारिताषिक प्राप्त झाले. 'राघववेळ' नंतर येणाऱ्या उनसावली या कादंबरी बद्दल वाचकाच्या मनात उत्सुकता निर्माण झाली होती. परंतु राघववेळच्या नंतर येणाऱ्या उनसावली या कादंबरीने मात्र वाचकालाही उनसावलीचाच आनंद दिला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

भारताला स्वतंत्र्य मिळून आज सत्तरवर्ष पूर्ण झालीस परंतु आजही जातीवादाची भिंत ढासाळताणा दिसत नाही. काहीसा त्या भिंतीचा रंग फिकट झाला असेल परंतु भितीचं पकड मात्र आजही तसीच आहे. यांचे चटके आजही अनेक जातींना बसत आहेत. मातंग ही अशीच एक शोषित जात आहे. हजारो वर्षा पासून दारिद्र , अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी परंपरेच्या चक्रव्यूहात चाकाच्या आरा होवून बसली आहे. उनसावलीतला रघू जाधव मातंग जातीतला कादंबरीचा नायक आहे. या कांदबरीचे कथनक रघूच्या भोवती फिरतांना दिसते. त्याच बरोबर विशिष्ट जातीतून रघू आला त्या वास्तवाचे चित्र अंतंमनात चांगल्या वाइटाची जाण ठेवून रघूची व्यथानि उत्कर्ष मनाचा ठाव घेतो ख़रे ! म्हणजे लेखकाच्या अंतर्मनातील व्यथा,वेदना, विचार, क्रांती तो पात्राच्या अनुषंगाने मांडत असतो. लेखकांचे विचार परिवर्तनाचे आहे. परंतु संघर्ष करण्याची वेळ येताच तो संघर्षापासून परावृत्त होतो. तसेच या कादंबरीतील रघू जाधवच्या बाबतीत होत असतांना दिसून येते.

नामदेव कांबळे मातंग समाजातील आहे. त्याच्या समाजातील अज्ञान, दारिद्र, अंधश्रध्दा यावर उनसावली या कादंबरीतून आपल्या अनुभुतीच्या बळावर अत: मनातील संघर्षासह प्रकाश



Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Menkar.Dist.Buldana

Scanned by TapScanner